Download Our Apps

१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

लोकशाही

लोक LIVE
तुमच्या मनातलं...!
www.lokshahilive.com

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/



गुरु पौर्णिमेच्या सर्वांना
लोकशाही माध्यम समूहातर्फे हार्दिक शुभेच्छा..!

जळगाव, गुरुवार, दि. १० जुलै २०२५ | RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024-26 | • अंक -२४१ • पाने ६ • किंमत ३ रु.

सोने-चांदी

- सोने (प्रति १० ग्रॅम) : ९६,६२०
- चांदी (प्रति १ किलो): १०७,३००

तापमान

- कमाल : ३१ अंश सेल्सिअस
- किमान : २५ अंश सेल्सिअस

महत्वाचे

मोदींना नामिबियाचा सर्वोच्च पुरस्कार

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना नामिबियाच्या सर्वोच्च नागरिक सन्मानाने 'ऑर्डर ऑफ द मोस्ट एन्शिएंट वेल्वित्शिया मिराबिलिस' ने गौरवण्यात आले आहे. हा पुरस्कार साल १९९५ पासून सुरु झाला आहे. विशिष्ट सेवा आणि नेतृत्व गुणांचा आदर करण्यासाठी नामिबिया राष्ट्रामार्फत हा पुरस्कार दिला जात आहे. या पुरस्काराचे नाव वेल्वित्शिया मिराबिलिस नावाच्या एका अत्यंत दुर्लभ आणि प्राचीन वाळवंटी झुडुपावर ठेवण्यात आले आहे. हा दुर्मिळ झाड केवळ नामिबियातच आढळते. या झाड संघर्ष, दीर्घायु आणि स्थायित्वाचे प्रतीक मानले जाते आणि हिच भावना या पुरस्काराच्या माध्यमातून झळकली जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नामिबियाचे राष्ट्राध्यक्ष डॉ. नेटुम्बो नांदी-नदैतवा यांच्या दरम्यान द्वीपक्षीय वार्तालाप झाला. यात भारत आणि नामिबिया संबंधांवर चर्चा झाली. दोन्ही नेत्यांनी डिजिटल तंत्र, संरक्षण, सुरक्षा, कृषी, आरोग्य, शिक्षण आणि महत्वपूर्ण खनिजे सारख्या क्षेत्रात सहकार्यासंदर्भात विस्ताराने चर्चा केली.

तुकडे बंदी कायदा रद्द

मुंबई – राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. तुकडा बंदी कायदा रद्द करण्यात आला आहे. याबाबत विधानसभेत घोषणा करण्यात आली आहे. यामुळे आता लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही घोषणा केली आहे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचा हा ऐतिहासिक निर्णय आहे. लवकरच या संदर्भात एक एसओपी तयार करण्यात येणार आहे. तुकडे बंदी कायदा आम्ही रद्द करत आहोत, लवकरच आम्ही त्या संदर्भातील नोटिफिकेश आम्ही काढणार आहोत, लवकरच या कायद्यामध्ये आम्ही बदल करणार आहोत. आम्ही या कायद्यासंदर्भातील सर्व बंधण मुक्त करत आहोत, लवकरच आम्ही एक एसओपी या संदर्भात जारी करू, ज्यामुळे सामान्य शेतकऱ्यांचं काम अधिक सोप होईल, त्यांना सरकार दरबारी हेलपाटे मारण्याची गरज राहणार नाही असं बावनकुळे यांनी म्हटलं आहे. पावसाळी अधिवेशन सुरू आहे, याचदरम्यान सरकारनं आता मोठा निर्णय घेतला आहे.

परवानगी शिवाय प्रतिक्रिया नको

मुंबई – मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ट्वीट करत पक्षातील नेत्यांना, माझी परवानगी घेतल्याशिवाय कुठल्याही प्रकारच्या माध्यमांशी संवाद साधायचा नाही असा आदेश दिला आहे. राज ठाकरेंनी असा आदेश का दिला याबाबत तर्क वितर्क लावले जात आहेत. अशातच आता राजकीय विश्लेषकांनी याबाबत आपले मत व्यक्त केले आहे.

वरणात वास, आमदाराची आग, किचनमध्ये धक्काबुक्कीचा साज!

आमदार संजय गायकवाड यांची मारहाण : विधानपरिषदेत पडसाद : मला कोणताही पच्छाताप नाही

लोकशाही न्यूज नेटवर्क
मुंबई प्रतिनिधी

शिवसेनेचे (शिंदे) आमदार संजय गायकवाड यांनी मुंबईतील आकाशवाणी आमदार निवासातील कँटिनमध्ये कर्मचाऱ्याला सर्वांसमोर बेदम मारहाण केली. निकृष्ट जेवण दिल्याचा आरोप करत आमदार गायकवाड यांनी मारहाण केल्याचे सांगितले. सदर व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर याचे पडसाद विधानपरिषदेतही उमटले. शिवसेनेचे (ठाकरे) नेते अनिल परब यांनी विधानपरिषदेत सदर मुद्दा उपस्थित करत संजय गायकवाड यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली. बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी आकाशवाणी आमदार निवासातील कॅन्टीनमधून जेवण मागवलं होतं. कॅन्टीनमधील जेवण निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे त्यांना राग अनावर झाला. त्यांनी कॅन्टीनमध्ये येऊन कॅन्टीन ऑपरेटरच्या कानशिलात लगावली. तसेच मारहाणही केली. यादरम्यान, कॅन्टीनमध्ये एकच गोंधळ उडाला होता. याचा व्हिडिओही सोशल मीडियात व्हायरल झाला. आमदार गायकवाड यांनी मंगळवारी रात्री आकाशवाणी आमदार निवासातील कॅन्टीनमधून जेवण मागवले. खराब डाळ आणि भात देण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. डाळाची दुर्गंधी पाहून संजय गायकवाड यांचा पारा चढला. संतप्त झालेल्या गायकवाड यांनी कॅन्टीन ऑपरेटरला जाब विचारला, पण उत्तर मिळाले नाही. त्यामुळे त्यांनी ऑपरेटरला बेदम मारले. लाथा-बुक्क्यांनी चोपलं. याचा व्हिडिओ व्हायरल झाला. त्यानंतर त्यांच्यावर टीकेची झोड उडाली. याबाबत त्यांनी स्पष्टीकरण देत अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. मारहाण केल्याचा मला कोणताही पच्छाताप नसल्याचेही त्यांनी यावेळी म्हटले. दरवर्षी सरकारला हजारो तक्रारी येतात. पण त्या दुर्लक्षित का केल्या जातात, याबाबत मला माहिती नाही. त्याची चौकशी का होत नाही? स्वयंपाकघरात उंदीर आणि घाण आहे. याची तपासणी व्हायला हवी, पण कोणालाच याची पर्वा नाही. यावर कारवाई व्हावी, अशी माझी विनंती आहे, असे गायकवाड यांनी सांगितले.

त्यांना माझ्या पद्धतीने समजावलं

शवसेना आमदार संजय गायकवाड म्हणाले,

पान २ वर »



डाळ खराब? सरकारच तुमचं आहे : राऊत

जर डाळ खराब असेल तर त्याला जबाबदार कोण? तुमचं सरकारच आहे. याच्यापेक्षा वाईट डाळ महाराष्ट्रामध्ये गोर-गरिबांच्या घरामध्ये आदिवासी पाड्यावर मिळते. मोदी जे फुकट धान्य वाटतायेत त्याची क्वालिटी पाहा. फक्त आमदारांना ५० कोटी मिळाले आहेत, ठेकेदारांना पैसे मिळालेले नाहीत. कँटीनमध्ये भ्रष्टाचार सुरू आहेच, पण टॉवलवर मारहाण करायची का? आमदाराने मारहाण करायची आणि आपली बाजू मांडायची की मला डाळ, भात मिळाली नाही. मला असं वाटत नाही, असं संजय राऊत म्हणाले.

त्या खात्याच्या मंत्र्यांना मारून दाखवा : परब

अनिल परब म्हणाले, ''राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जनता सुसंस्कृत नेते म्हणून पाहते. अशा मुख्यमंत्र्यांच्या सरकारमधील एक माजलेला आमदार टॉवेल, बनियानवर कँटिनमध्ये येऊन कर्मचाऱ्यांना बॉक्सिंग स्टाईलमध्ये मारत आहे.'' सरकारचे आमदारांवर वचक आहे की नाही? निकृष्ट दर्जाचे जेवण मिळाले म्हणून बनियान, टॉवेलवर जाऊन आमदाराने मारहाण करावी का? आमदाराने किमान काही संकेत पाळायला नको का? ही काय रस्त्यावरची, गल्लीतली माणसे आहेत का? तुमच्यात (आमदार) ताकद असेल तर त्या खात्याच्या मंत्र्यांना मारून दाखवा. त्या कर्मचाऱ्याचा काय गुन्हा होता?, असाही प्रश्न अनिल परब यांनी उपस्थित केला.

कोणालाही मारणं योग्य नाही : शिंदे

निकृष्ट दर्जाच्या जेवणामुळे सगळ्यांना त्रास होऊ शकतो, ते जेवण खाल्ल्यामुळे त्यांना उलटी झाली म्हणून रागाच्या भरात त्यांनी हे कृत्य केलं. मात्र आमदार म्हणजे लोकप्रतिनिधी आहे, कायदेशीर कारवाई करायचे अधिकार त्यांना आहेत. कोणालाही मारहाण करणं योग्य नाही. मी संजय गायकवाड यांना समज दिली आहे, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. दरम्यान गायकवाड यांच्या निलंबणाची मागणी सुरू आहे, यावर देखील एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. विरोधकांना रोज अधिवेशनात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोलण्याची संधी आहे, आणि सरकार म्हणून चर्चेला उत्तर देण्याची आमची तयारी असते. मात्र सभागृहात बोलण्यापेक्षा त्यांना बाहेर बोलण्यात जास्त रस असतो कारण तिथे कॅमेरे असतात, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

मतदारांना शिवीगाळ ते महाराजांचा अपमान...

महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य : छत्रपती संभाजी महाराजांनी १६ भाषा शिकल्या मग ते मूर्ख होते का? अशा आशयाचे वक्तव्य संजय गायकवाडांनी केले होते. यामुळे महापुरुषांचा अपमान झाल्याचा आरोप होऊन मोठा वाद निर्माण झाला होता.

राहुल गांधींविरोधात वादग्रस्त विधान : राहुल गांधींची जीभ कापणाऱ्याला ११ लाख बक्षीस देण्याची घोषणा केली. यामुळे देशभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आणि त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी झाली.

मतदारांना जाहीर शिवीगाळ : फक्त दारू-मटण अन् दोन हजारात विकले भाड साले, यांच्यापेक्षा रां बऱ्या'' असे मतदारांबद्दल आक्षेपार्ह शब्द वापरले. या वक्तव्याचा व्हिडिओ व्हायरल होऊन त्यांच्यावर जोरदार टीका झाली.

पोलिसांबद्दल अपमानास्पद वक्तव्य : महाराष्ट्र पोलिसांना 'अकार्यक्षम खातं' म्हटले आणि त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले. त्यावेळी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही नाराजी व्यक्त करत ताकीद दिली.

पोलीसाला गाडी धुवायला लावली : एका पोलीस कर्मचाऱ्याला आपली गाडी धुवायला लावल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला, ज्यामुळे पोलिसांच्या गैरवापराचा आरोप झाला.

शेतकऱ्यांना वादग्रस्त सल्ला : 'सरकारने कर्जमाफी दिली नाही, तर शेतकऱ्यांनी बँकांच्या दारात जाऊन मारामारी केली तरी चालेल' असे वक्तव्य केले. यामुळे शेतकऱ्यांना हिंसक मार्गासाठी प्रोत्साहन दिल्याचा आरोप झाला.

महायुतीतील बंडखोरीवर टीका : भाजपचे माजी आमदार विजयराज शिंदे यांच्या बंडखोरीवर 'विजयराज शिंदे ही चिल्लर केस, त्याच्या बापात दम असेल तर...' असे आक्षेपार्ह विधान केले.

कॅन्टीन चालकाला मारहाण : संजय गायकावाडांनी आमदार निवासातील कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारहाण केली. जेवणातील डाळ खराब झाल्याचे लक्षात आले ज्यामुळे त्यांनी कॅन्टीन चालकाला जाब विचारला. त्याच्याकडून व्यवस्थित उत्तर मिळत नसल्याचे पाहून गायकवाडांनी त्याच्यावर हात उगारला.

सतत चर्चेत राहण्याची वृत्ती : आक्रमक आणि बेधडक शैलीमुळे आमदार संजय गायकवाड सतत प्रसारमाध्यमांमध्ये चर्चेत राहतात. अनेकदा त्यांच्या वक्तव्यांमुळे पक्ष आणि सरकारलाही अडचणींचा सामना करावा लागतो. या सर्व घटनांमधून संजय गायकवाड हे त्यांच्या बेधडक वक्तव्यांमुळे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या वादांमुळे नेहमीच चर्चेत राहिले आहेत हे स्पष्ट होते.

रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या संघर्षाला २५ वर्षांनंतर न्याय

लोकशाही न्यूज नेटवर्क
चाळीसगाव वृत्तसंस्था

चाळीसगाव नगरपरिषदेच्या आस्थापनेवर मंजूर व रिक्त पदावर सन १९९८ पासून रोजंदारी तत्त्वावर नियुक्त केलेल्या १८ कर्मचाऱ्यांची सेवा त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून नियमित करण्याच्या व त्यांना निवृत्तीवेतन व कुटुंबनिवृत्तीवेतन सुरू करण्याचा निर्णय काल राज्य शासनाने घेतला असून तसा शासन निर्णय देखील प्रकाशित झाला आहे. गेल्या २५ वर्षांपासून या रोजंदारी कर्मचाऱ्यांचा त्यांच्या हक्कासाठी न्यायालयात व शासन दरबारी संघर्ष सुरू होता, मी आमदार झाल्यानंतर सदर प्रकरणात वैयक्तिक लक्ष दिले व सुदैवाने राज्यात भाजपा महायुती सरकार आल्यानंतर या प्रस्तावाला खऱ्या अर्थाने चालना मिळाली. या शासन निर्णयामुळे गेली २५ ते ३० वर्ष चाळीसगाव नगरपरिषदेत विविध आस्थापनांवर सेवा बजावणाऱ्या या कर्मचाऱ्यांच्या सेवेला न्याय मिळाला आहे. काल सदर रोजंदारी कर्मचारी यांनी माझी मुंबई येथील कार्यालयात भेट घेतली असता त्यांचे अभिनंदन केले. सदर १८ रोजंदारी कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणारा हा निर्णय घेतल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे, जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांचे जाहीर आभार मानतो. सदर १८ कर्मचाऱ्यांपैकी चाळीसगांव नगरपरिषदेचे १४ कर्मचारी असून, शासन निर्णय दि. ०५. ०२. २०१९ अन्वये समावेशनाने शहादा नगरपरिषदेत २ कर्मचारी व आळंदी नगरपरिषद व पारोळा नगरपरिषदेत प्रत्येकी १ कर्मचारी कार्यरत आहेत. या १८ कर्मचाऱ्यांपैकी ४ कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून त्यापैकी २ कर्मचारी मयत आहे. त्यांची झालेली सेवा विचारात घेऊन सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून त्यांचे सेवानिवृत्ती वेतन व कुटुंबनिवृत्तीवेतन निश्चित करण्याची कार्यवाही नगरपरिषद प्रशासन संचालनालय व मुख्याधिकारी, चाळीसगाव नगरपरिषद यांनी करावी असे देखील शासन निर्णयात निर्देश देण्यात आले आहेत. कर्मचाऱ्याचे नाव, पद व कार्यरत ठिकाण

पान २ वर »

कुऱ्हाडीच्या हल्ल्यात जखमी आजीचा मृत्यू !

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीसाठी कर्ज घेतल्यावरून झालेल्या वादात आजीच्या डोक्यात कुऱ्हाडीने वार करून तिला गंभीर जखमी केल्याची घटना धरणगावात घडली होती. या हल्ल्यात आजी गंभीर जखमी झाली होती. मात्र आता यात जहामी वृद्ध महिलेचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे ही घटना आता खुनात बदकली आहे.

या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या लिलाबाई रघुनाथ विसपुते (वय ७०, रा. महाबळ) यांचा पुणे येथे उपचार सुरू असताना ८ जुलै रोजी दुपारी ३ वाजता मृत्यू झाला. त्यामुळे या प्रकरणी धरणगा पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात आता खुनाचे कलम वाढविण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. सविस्तर माहिती अशी की, शेअर मार्केटमध्ये मोठ्या प्रमाणावर कर्ज घेतल्याने लिलाबाई विसपुते यांनी नातू तेजस विलास पोतदार (रा. धरणगाव) याला रागवले होते. यावरून त्यांच्यात अनेकदा वाद झाले होते. २६ जून रोजी दुपारी सव्वा तीन वाजण्याच्या सुमारास तेजस आणि लिलाबाई यांच्यात शेअर मार्केटच्या कर्जावरून पुन्हा एकदा

पान २ वर »

विश्राम जीन्सीमध्ये दंगल; ५२ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

लोकशाही न्यूज नेटवर्क
रावेर प्रतिनिधी

किरकोळ कारणावरून दोन गटात दंगल होऊन यात आठ जण जखमी झाले असून दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना रावेर तालुक्यातील विश्रामजीन्सी येथे काल घडली. याप्रकरणी दोन्ही गटातील ५२ जणांविरुद्ध रावेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आठ जणांना अटक केली आहे. याबाबतचे वृत्त असे की विश्राम जीन्सी येथे काल सायंकाळी सहा वाजेचे सुमारास घरासमोर लाठी उभी करणेचे किरकोळ कारणावरून एकाच समाजाच्या दोन गटात जोरदार हाणामारी, दंगल झाली. यावेळी शिवीगाळ, मारण्याची धमकी देऊन लाठी, काठी, कुऱ्हाड, लोखंडी सळई, दगड, विटांनी एक मेकांना मारहाण केली. या दंगलीत कर्तार पवार (वय ४५), सुरसिंग पवार

पान २ वर »

भडगावात भीषण अपघात : २१ वर्षीय तरुण जागीच ठार

कार चालकाने दुचाकीस्वारास उडवले

लोकशाही न्यूज नेटवर्क
भडगाव प्रतिनिधी

भडगाव शहरातील यशवंत नगर भागातील २१ वर्षीय तरुण शेतात कामाला जात असताना समोरून येणाऱ्या व्हॅगनार गाडी ओव्हरटेक करण्याच्या नादात २१ वर्षीय दुचाकी स्वरास उडवले. यामध्ये तरूणाचा जागीच मृत्यू झाला. ही घटना दिनांक आठ रोजी सायंकाळी सातच्या सुमारास पाचोरा रस्त्यावरील आरटीओ ऑफिस जवळ घडली. याबाबत भडगाव पोलीस स्टेशनला वॅगनार गाडी चालकाविरुद्ध गुन्हा

पान २ वर »

मुसळधार पावसाचा कहर

लोकशाही न्यूज नेटवर्क
नागपूर प्रतिनिधी

नागपूर आणि गडचिरोली जिल्ह्याला संततधार पावसाने अक्षरश: झोडपून काढले आहे. रविवार रात्रीपासून सुरु झालेला पाऊस अजिबात थांबलेला नाही, ज्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. तसेच गडचिरोली जिल्ह्यातही पूरस्थिती गंभीर बनली असून गोसीखुर्द धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरु आहे. त्यामुळे अनेक नद्यांना पूर आला आहे. नागपूर जिल्ह्यात गेल्या ६० तासांत सुमारे १७२.२ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. तसेच शाळांना सुट्टी देण्यात आली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातही वैनगंगा नदीच्या पाणी पातळीत सातत्याने वाढ होत आहे. वैनगंगा दुथडी भरून वाहत असल्याने ब्रह्मपुरी तालुक्यातील अनेक नदी-नाल्यांची पाणी पातळी वाढली आहे. मुडझा-गांगलवाडी आणि गांगलवाडी-आरमोरी मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. वैनगंगा नदीच्या पाणी

पान २ वर »

मुसळधार पावसात पूल कोसळून 11 जणांचा मृत्यू

वडोदरा-आणंद दरम्यानची घटना : अनेक वाहने पाण्याखाली : पूल ४५ वर्षे जुना असल्याची माहिती

लोकशाही न्यूज नेटवर्क
आणंद प्रतिनिधी

गुजरातमध्ये मुसळधार पावसात पूल कोसळल्याची घटना घढली आहे. बुधवारी सकाळी आणंद आणि वडोदरा यांना जोडणारा गंभीरा पूल कोसळला. त्यामुळे अनेक वाहने नदीत कोसळली. या अपघातात ११ जणांचा मृत्यू झाला तर ३ जणांना वाचवण्यात यश आले आहे. काँग्रेस नेते आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते अमित चावडा यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करून यासंदर्भात माहिती दिली आणंद आणि वडोदरा जिल्ह्यांना जोडणारा मुख्य गंभीरा पूल कोसळला. अनेक वाहने नदीत पडल्याने मोठी जीवितहानी होण्याची शक्यता आहे. घटनास्थळी बचावकार्य करण्यात येत असून वरिष्ठ अधिकारी तळ ठोकून आहेत. गुजरातमधील आणंद जिल्ह्यातील हा गंभीरा पूल अचानक मधूनच तुटला. हा पूल महिसागर नदीवर आहे आणि तो कोसळल्याने दोन जड ट्रक नदीत पडले. अपघातानंतर स्थानिक प्रशासन आणि आपत्ती निवारण पथके लगेचच घटनास्थळी पोहोचली असून बचावकार्य सुरू आहे. पाणबुड्यांच्या मदतीने नदीत पडलेल्या चालकांचा आणि इतर संभाव्य जखमींचा शोध घेतला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून गुजरातमध्ये पाऊस सुरू आहे.

'ही' वाहने पडली

माहितीनुसार गंभीरा पूल तुटला तेव्हा त्यावेळी पुलावर काही वाहने होती. ज्यांची धडक झाली. दोन ट्रक, एक बोलेरो जीपसह चार वाहने नदीत पडली. माहिती मिळताच पोलिस आणि अग्निशमन दल पोहोचले आणि गोताखोरांनी लोकांना वाचवण्यासाठी नदीत बचाव कार्य सुरू केले. गंभीरा पूल हा महिसागर नदीवर बांधण्यात आला होता, जो वडोदरा आणि आनंदला जोडतो. मुसळधार पावसामुळे नदीला पूर आला होता, ज्यामुळे पूल तुटला आणि नदीत वाहून गेला. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने बचाव कार्य सुरू केले आणि ३ जणांचे प्राण वाचवले. या अपघातात २ जणांना आपला जीव गमवावा लागला.